माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -१२०२+१२०३/२०२४/कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| तक्रारदार | उत्तरवादी |
|---|---|
| श्री.श्रीकृष्ण सीताराम साळगांवकर | प्रथम अपीलिय अधिकारी तथा उप आयुक्त (२), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर |

(निर्णय दिनांक- ०९ /०४/२०२५)

तक्रारदार यांनी दिनांक २०२४/०९/१३ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार दोन तक्रार अर्ज दाखल केले आहेत. तक्रारदार यांनी आयोगाने द्वितीय अपील क्रमांक २३५२/२०२३ या प्रकरणी आदेश प्रमाणे माहिती मुदतीत दिली नाही आणि २०४२/२०२४ या द्वितीय अपील या प्रकरणी माहिती व्यक्तिशा देण्यात आली नाही शिपाया मार्फत पोहोच करण्यात आली, अशा आशयाची तक्रार केली आहे ,

माहितीशी संबंधित द्वितीय अपील क्रमांक २३५२/२०२३ या प्रकरणी दिनांक १३/०३/२०२४ रोजी व द्वितीय अपील क्रमांक २४२/२०२४/कोल्हापूर यामध्ये दिनांक १८/०३/२०२४ रोजी आयोगाने सुनावणी घेऊन निर्णय पारित केले आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून असे स्पष्ट होते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार दोन्ही अपील प्रकरणी दिनांक २६ /०८/२०२४ च्या पत्रांन्वये उप आयुक्त (२), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी अपीलयार्थी यांना मुद्देनिहाय उत्तर दिले आहे.या वरुन असे दिसून येते कि सादर दोन्ही प्रकरणी उप आयुक्त (२), कोल्हापूर महानगरपालिका, यांनी आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदार यांना माहिती पुरवली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी आयोगाच्या स्तरावर अधिक कार्यवाहीची गरज नाही. आयोगाचे आदेश खालील प्रमाणे आहेत.

आदेश

तक्रारदार यांचे तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

9.4.25

( मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्र.- १२०२+१२०३/२०२४/कोल्हापूर 17692/2025

दिनांक 23/4/2025

रामाआ-पुणे/२०२५/RCG